# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

लेखा व वित्त विभाग

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in


**अत्यंत महत्त्वाचे**

**कालमर्यादित**

जा.क्र.लेखा/२९/कावि/२६९/२४

दि. ३/१०/२०२४

## परिपत्रक

विषय : वार्षिक अर्थसंकल्पामधील कामांच्या अंदाजपत्रकीय ( estimate ) रकमांबाबत.

नविन कामांचे अंदाजपत्रक तयार करताना कामाची अंदाजीत रक्कम गृहीत धरून अशा कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये केला जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रक्रीयेमध्ये विभागांकडून कामांना फुगीर अंदाजपत्रकीय रकमा ठेवल्या जातात तदनंतर सदर कामाची स्थळ पाहणी करून कामाचे पूर्वगणनपत्रक ( estimate ) तयार करून त्यास तांत्रिक मान्यता घेण्यात येते. या प्रक्रीयेमध्ये कामाची अंदाजीत रक्कम व तांत्रिक मान्यतेची मिळालेली रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे आढळून आलेले आहे व याबाबत विविध लेखापरिक्षणात देखील आक्षेप उपस्थित करण्यात आलेले आहेत व त्यामुळे अर्थसंकल्पामधील सर्व कामांची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम ही मोठ्या प्रमाणात फुगीर दिसून येत असून अंदाजपत्रकीय रक्कम व अर्थसंल्पीय तरतूदीमध्ये मोठ्या प्रमाणात तुट दिसून येत आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये कामांच्या पूर्वनियोजीत केलेल्या अंदाजीत रकमांपर्यंत पोहोचणेकरीता पूर्वगणनपत्रकामध्ये ( estimate ) आवश्यकता नसतानाही काही बाबी ( Items ) समाविष्ट केल्याचे /वाढविल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही आर्थिक स्वरूपाची असल्याने लेखा संहिता, आर्थिक औचित्य व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने योग्य नसून भविष्यामध्ये महानगरपालिकेस आर्थिक अडचण निर्माण होऊ नये त्याकामी योग्य त्या उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहेत. अंदाजपत्रकीय रक्कम ही पूर्वगणनपत्रक ( estimate ) रक्कमे इतकी असणे आवश्यक आहे.

सबब, सर्व संबंधित विभागांना सुचीत करणेत येते की, अंदाजपत्रकात नविन कामाचा समावेश करणेपूर्वी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून व त्याबाबत प्रमाणित करूनच प्रत्येक कामाचे पूर्वगणनपत्रक ( estimate ) तयार करावे व त्यास तांत्रिक मान्यता घेतल्यानंतरच सदरचे काम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करणेत यावे. सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकामध्ये नविन कामाचा समावेश करताना नविन कामांचे समोर जी अंदाजपत्रकीय रकमा दर्शविण्यात येईल त्यांचे पूर्वगणनपत्रक ( estimate ) सादर करावेत. अर्थसंकल्पामधील कामांना फुगीर रकमा दर्शविल्यामुळे महानगरपालिकेस अडचण निर्माण झाल्यास अथवा कोणताही आक्षेप उपस्थित झाल्यास संबंधित विभागास जबाबदार धरणेत येईल. सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी नोंद घ्यावी व सर्व संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( शेखर सिंह )

**आयुक्त तथा प्रशासक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी

प्रति:- सर्व संबंधीत विभाग/ विभागप्रमुख